

# जीवनाचे वास्तव




## The Reality of Life (Marathi)

मौलाना वहीदुद्दीन खान


Books on Peace and Spirituality by
**Maulana Wahiduddin Khan**




The purpose of this book is to re-engineer the mind of those who think in terms of voilence. The book has a twofold target : first to help those how are engaged in voilence realize that the present age is an age of peace. Second, the author expounds on the guiding principles that should govern the actions of those who want to establish peace in society.
Pages : 192




Islam has become synonymous with global political jihad today and islamic spirituality is often mistaken for orthodoxy. Then how do young Muslims hold on to their faith? How do they open the door for others to appreciate the true beauty of their religion ?
Pages : 222




Lucidly written and expensive in scope, this work clears up the misunderstandings that abound on the subject of islamic teachings about peace and war. It clearly states the authentic position on these mattes, which is that islam is a completely peaceful religion.
Pages : 352

# अल्लाहची निर्मिती योजना

अद्‌भुत व अफाट विश्वामध्ये माणूस अद्‌भुत आहे. असे एका पाश्चिमात्य तत्ववेत्त्याने लिहिले आहे. असे वाटते की माणसासाठी जगाची निर्मिती झालेली नाही अथवा माणसाची जगासाठी निर्मिती झालेली नाही. दोन्ही असमान आहेत, असे दिसते.

अमर्याद सामर्थ्यानिशी माणूस जन्मास आला परंतु सध्याच्या जगात त्याला त्याचा फारच कमी उपयोग होतो. त्याच्या स्वभावानुसार शाश्वत राहाण्याची मनुष्याची इच्छा असते. परंतु लवकरच मुत्यु येतो आणि त्याच्या जीवनाचा शेवट होतो. त्याच्या मनामध्ये आशाआकांक्षाचा कल्लोळ असतो परंतु या आकांक्षा कधीच पूर्ण होत नाहीत. त्याच्या मनात आशाआकांक्षाचे जीवन घर करून असते, परंतु या आशाआकांक्षा कधीच पूर्ण होत नसतात. यामध्ये गरीब माणूस आणि श्रीमंत माणूस असा कोणताही भेद नसतो. सध्याचे जग आणि माणूस यांच्यात इतकी असमानता का आहे? अल्लाहच्या निर्मिती योजनेमध्ये याचे उत्तर आम्हास मिळू शकते.

वास्तव असे आहे, की अल्लाह-मानवाच्या निर्मात्याने आपल्या योजनेनुसार माणसाची निर्मिती केली. ही योजना समजण्यासाठी माणसाने स्वतःस समजून घेणे आवश्यक आहे. एखादी मशीन कशी चालते हे ते तयार करणाऱ्या इंजीनिअरच्या प्लॅनवरून आपणास समझते. इंजीनिअर ते मशीन कशासाठी आहे याचा खुलासा करणारे दुसरे कोणते साधन नाही. माणसाचे असेच आहे.

माणूस म्हणजे अपूर्व चमत्कार आहे. संपूर्ण विश्वामध्ये असे दुसरे उदाहरण सापडत नाही. सर्व जैवविविधतेत माणूस सर्वोत्कृष्ट आहे, असे म्हणतात. याचाच अर्थ सर्व निर्माण झालेल्या प्राणीमांत्रा मध्ये तो सर्वोत्कृष्ट आणि अर्थपूर्ण ‘सजीव प्राणी’ आहे. अशा प्रकारची अर्थपूर्ण सजीव निर्मिती काही उद्देशा खेरीज करण्यात आली नसावी. माणसाच्या निर्मात्याने खास योजनेनुसार त्याची निर्मिती केली. या अपूर्ण जगामध्ये माणसाने आपल्या कसोटीचा कालावधी व्यतीत करावा. त्यानंतर त्याने केलेल्या कृत्यानुसार शाश्वत जगात राहण्याचा हक्क त्याला मिळेल. याचेच दूसरे नाव आहे, स्वर्ग!

निर्मात्याने जोडीतून निर्माण केलेला एक भाग म्हणजे हे जग (सध्याचे जग) जिथे आपल्या जन्मानंतर आपण राहतो, आणि दुसरा भाग म्हणजे शाश्वत जग, जिथे आपण मृत्युपश्चात राहतो. निर्मात्याने अशा प्रकारे माणसाची शाश्वत सजीव

प्राणी म्हणून निर्मिती केली आणि त्याचे जीवन दोन भागात विभागले. मृत्यूपूर्वीचा कालावधी अर्थात या जगातील जीवन आणि मुत्युपश्चात जीवन-अर्थात मृत्युनंतरचे जीवन! मृत्युपूर्वीचा मर्यादित कालावधी म्हणजे माणसाचा कसोटीचा कालावधी आणि मृत्युपश्चात जीवनाचा कालावधी म्हणजे त्याला मिळणारा मोबदला किंवा मिळणारी शिक्षा जी त्याच्या कसोटीच्या कृत्यावर अवलंबून असते. निर्मात्याकडून निर्धारित करण्यात आलेल्या या जगातील अस्तित्वाची योजना अशी आहे, आणि मृत्युनंतर स्वर्गात राहण्यास कोण पात्र आहे, हे पाहणे हाच खरा निर्मितीचा उद्देश आहे.

# स्वर्ग म्हणजे काय?

स्वर्ग हे एका अशा जगाचे नाव आहे ज्याच्याबद्दल प्रत्येक पुरूष व स्त्रीच्या मनात आकर्षण असते. स्वर्ग म्हणजे ज्याठिकाणी मनुष्याच्या व्यक्तीमत्वाचा पूर्ण विकास होतो. या ठिकाणी हवा तसा विचार करतो, त्याला जे हवे ते तो पाहतो, त्याचा आवडीचा आवाज़ तो ऐकू शकतो. अर्थात आनंद देणाऱ्या वस्तुला तो स्पर्श करू शकतो. या ठिकाणी तो अशा लोकांच्या समुहात असतो जे त्याचे जीवन अर्थपूर्ण बनवतात. इथे सुखद वारा वाहतो, ज्याची इच्छा आहे ते खाद्यान्न आणि कल्पनेतील पेय त्याला मिळते.

# स्वर्गासाठी निकष !

निर्मात्याच्या योजनेनुसार वेळोवेळी कसोटी म्हणून आयुष्यभर मनुष्यास संकटग्रस्त परिस्थितीचा मुकाबला करावा लागतो. निर्मात्याच्या योजनेनुसार आपत्ती आणि दुःख एक दुसऱ्यांशी निगडित आहेत. कसोटीच्या या जीवनांतून सुटका करून घेण्याचे सामर्थ्य कोणत्याही व्यक्तीत नाही. सध्याचे जग हे उपभोग आणि आराम करण्यासाठी अस्तित्वात आलेले नाही ही वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु निर्मात्याच्या निर्मिती योजनेच्या जाणीवेच्या अभावामुळे जे काही प्रचलित आहे ते त्याला उमगत नाही. आणि म्हणून परिस्थितीबाबत त्यांची प्रतिक्रिया नकारार्थी असते आणि त्यामुळेच निर्मात्यापुढे ते अपयशी ठरतात.

प्रत्येक दिवशी मानसिक दबाव ही मोठी समस्या आहे. मानसिक दबाव कमी करण्याचा दावा करणाऱ्या लोकांनी दबावमुक्त होण्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या आहेत. प्रत्यक्षात या संस्था काय करतात? ते लोकांना त्यांची

विचारसरणी थांबवण्यास सांगतात आणि त्यांचावर एक प्रकारे संमोहनाची प्रक्रिया करतात. मानसिक दबावावर हा उपचार नाही. मानसिक दबाव नाहिसा करण्याचा प्रयत्न करणें, त्याच्या विरूद्ध कृती करणे आणि कसोटीत उत्तीर्ण होणें हाच उचित उपाय आहे आणि योग्य मार्ग आहे. योग्य धडा घेण्यासाठी अनेक गोष्टी या जगामध्ये निर्माण करण्यात आल्या आहेत. नावडत्या अनुभवातून माणसास पुढच्या जगाची अर्थात स्वर्गाचे स्मरण व्हावे हा धडा मिळावा ही अपेक्षा आहे.

या निर्मिती योजनेच्या माध्यमातून दिसून येते, की मानवी समस्यांचे मूळ कारण मृत्युपूर्वीच या जगात स्वर्ग निर्माण करण्याची त्याची महत्वाकांक्षा. मात्र स्वाभाविक नियमानुसार जगातील परिस्थिती मुळे ते अशक्य आहे. अल्लाहच्या निर्मिती योजनेप्रमाणे मृत्युपूर्वी या जगात माणसाने समाधानी रहावे म्हणजे मृत्युनंतरच्या जीवनात स्वर्गप्राप्तीची हमी निश्चित होईल हा निर्मितीचा नियम मान्य करणे आणि त्याप्रमाणे त्याने त्याच्या जीवनांचे नियोजन करणे हेच माणसासाठी योग्य आहे. निर्मात्याच्या नज़रेत त्याने स्वतःस स्वीकारार्ह करावे, म्हणजेच तो स्वर्गात जाण्यासाठी पात्र होईल. मृत्युनंतर शाश्वत जग आहे या अल्पकालीन जगामध्ये शाश्वत जगाची जो ओळख करून घेतो त्याचप्रमाणे या ऐहिक जगात ज्याला त्रुटी सापडली आहे आणि शाश्वत जगाचे रहस्य सापडले आहे तोच खरा यशस्वी.

# अति महत्वाची समस्या

माणसांच्या एका समूहास विचारण्यात आल्यास की आज माणसापुढे सर्वाधिक महत्वाचा प्रश्न काय आहे? तर लोक याचे वेगवेगळे उत्तर देतील. काही म्हणतील अण्वस्त्रात होणारी वाढ, तर काही म्हणतील लोकसंख्येत होणारी वाढ, तर काहीच्या दृष्टीकोनातून संपत्तीचा उगम आणि त्याचे वाटप. ही सर्वाधिक महत्वाची समस्या आहे. अशा प्रकारे ही परस्पर विरोधी मतःप्रणाली दर्शवते. की सर्वसाधारणपणे लोकांनी स्वतःसच ओळखले नाही. तसे झाले असेल तर त्या सर्वांचे याबाबतीत मतैक्य झाले असते. की मानवाच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करणे ही सर्वाधिक मोठी समस्या आहे.

एक दिवस मृत्यु येणार आहे आणि मृत्यु अटळ आहे याकडे माणूस दुर्लक्ष करतो त्याचप्रमाणे निर्मात्याकडे एक दिवस हिशेब द्यावा लागतो याकडेही दुर्लक्ष करतो, किंबहुना याबद्दल तो ठाम आहे. या जगाकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्याने मृत्युपश्चात जीवनाकडे लक्ष केंद्रित केल्यास त्याला त्याच्या अस्तित्वाचे ज्ञान

होईल. संध्याकाळच्या धावपळीच्या वेळी तुम्ही क्रास रोडवर उभे राहून निरीक्षण केले तर आजच्या माणसाने कोणत्या प्रश्नांची मूलभूत प्रश्न म्हणून निवड केली आहे हे लक्षात येईल. रस्त्यामध्ये न संपणारी वाहतूक असेल असे तुम्ही का समजता? दुकानदाराने आपल्या दुकानाची सजावट का केली आहे? माणसांची झुंड कोठून येते आणि ती कोठे जात आहे? लोकांच्या संभाषणाचा मुख्य विषय काय असतो आणि एक दुसऱ्यास भेटण्याचा हेतु काय असतो? त्याचे सर्वोत्तम बुद्धि कौशल्य आणि साधनसामग्रीचा कोणत्या कामासाठी उपयोग केला जात आहे? जर तुम्ही या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत असाल तर माणसाने आपले जीवन कशावर उभारले आहे आणि काय संपादन करण्याचा त्याचा प्रयत्न आहे याचा अनुमान तुम्ही करू शकता.

हे सर्वार्थाने स्पष्ट आहे, कि आजचा माणूस केवळ आपल्या महत्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी धावत पळत आहे. मुत्युपश्चात जगापेक्षा या जगासाठीच तो उतावीळ झालेला आहे. ऐहिक महत्वाकांक्षेच्या पुर्ततेसाठी त्याचे जीवन हेलाकावे खात आहे. ते त्याला चकवत आहे, यातच दुःखाचा उगम आहे. त्याच्या यशाची दैनांदिनी म्हणजे गरजेच्या वस्तूंची उपलब्धता. विश्रांतीतून मिळणारा आराम आणि नित्याचे स्वागत. जर हे मिळाले नाही तर ते अपयश! संपूर्ण मानव जगत याचा पिच्छा करीत आहे, उद्याचा कोणी विचारच करत नाही. आत्ताचा आताच या क्षणीच मिळावे म्हणून प्रत्येक जण उन्मन्त असतो.

आपल्या मोठया शहरात नव्हे, तर अगदी तुम्ही जेथे जाता त्या छोटया वसाहतीतदेखील हीच अवस्था आहे. लोक एकाच प्रकारच्या विचाराने पछाडलेले आहेत. पुरूष आणि स्त्री, श्रीमंत आणि गरीब, वृद्ध आणि तरूण, शहरी आणि ग्रामीण, धार्मिक आणि अधार्मिक सर्व एकाच दिशेने धावत पळत आहेत. ऐहिक प्राप्तीच्या वेठीवर त्यासाठी आपली श्रद्धा आणि सद्सद्विवेक बुद्धी यांची आहूती देण्यास माणूस सदैव तत्पर आहे. ऐहिक जीवनाच्या ध्येयासाठी त्याचा संघर्ष आहे. त्याचा हा संघर्ष त्याच्यावर काय लादणार आहे याची त्याला पर्वा नाही. अशा प्रकारे प्राप्त झालेले प्रत्येक ‘यश’ हे क्षुल्लक आणि ऐहिक असते. आणि मृत्युपश्चात जीवनात ते निरूपयोगी ठरते. मृत्युपश्चात जीवनाच्या बदल्यात आपले ऐहिक जीवन दृढ करण्यासाठी चिंतातूर असतो तो असा तरूण आहे जो आपल्या वृद्धापकाळासाठी काहीच बचत करत नाही. अखेरीस ती वेळ येते ज्यावेळी त्याचे बाहू निकामी होतात आणि त्यानंतर परिश्रम करण्यासाठी तो असमर्थ होतो. त्यावेळी ती बिकट अवस्था त्याच्या लक्षात येते. त्यामुळे तो स्वतःसाठी काही तरतूद

करू शकत नाही. हेच आपल्या मृत्युपश्चात जीवनाच्या बाबतीतही आहे. आपली सद्याची अवस्था दृढ करण्यासाठी आपण सचिंत असतो, उद्याचा आपण कधी विचार करत नाही. जरी आपल्या अवतीभोवती आपल्या डोळयांनी आपण लोकांचा मृत्यु पाहत असलो तरी कृती करण्यास आम्ही उद्युक्त होत नाही. युद्ध काळात ज्यावेळी धोक्याचा इशारा देणारा सायरन होतो, गारठून टाकणारा आक्रोश होतो की हे शहर शत्रूच्या बॉम्ब वर्षावाने उद्ध्वस्त होणार आहे तेव्हा बॉम्ब वर्षावा पासून त्वरित सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या, अशी घोषणा होते. प्रत्येकजण ताबडतोब सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतो आणि क्षणार्धात गजबजलेले रस्ते निर्मनुष्य होतात. जी व्यक्ती अशा प्रकारे अंमलबजावणी करीत नाही ती व्यक्ती वेडसर आहे असे समजले जाते.

दुसरे एक संकट आहे, भयंकर आणि अटळ. ज्याचा जगाच्या निर्मात्याने सावधानतेचा इशारा दिला आहे त्याकडे आपण दुय्यम विचार म्हणूनदेखील लक्ष देत नाही. काय आहे हा सावधानतेचा इशारा? हा जगाच्या निर्मात्याचा इशारा आहे. मानवास त्याने आपल्या पैगंम्बरांमार्फत त्याच्या आज्ञा दिल्या आहेत. माझी प्रार्थना करा, परस्परासंबंधी तुमचे कर्तव्य करा आणि माझ्या मर्ज़ी प्रमाणे राहा. जर तुम्ही असे केले नाही तर मी तुम्हाला अशा प्रकारे इज़ा देईन ज्याची तुम्ही कल्पना करू शकत नाही. प्रत्येक जण हे प्रकटण ऐकत असतो. एका अथवा दुसऱ्या स्वरूपात प्रत्येक जण ते मान्य करतो, परंतु प्रत्यक्षात याचा काही परिणाम होत नाही. अशा दृष्टिकोनातूनच त्याच्याकडे पाहिले जाते. जगातील लाभ प्राप्त करण्यासाठी प्रत्येक जण अपराध करीत असतो.

मृत्युपश्चात जीवनातील लाभासाठी मात्र ते योग्य कृती करीत नाहीत. असा ह्या जीवनाचा काफला त्या दिशेला जातो, जेथून परतीचा प्रवास नाही. लष्कराच्या मुख्यालयातून सायरन वाजले तर लोक प्रतिसाद देतात. परंतु मानवास विश्वाच्या पालनकर्त्याने जो इशारा दिला आहे त्यास कोणतेच महत्व दिले जात नाही. त्या ध्वनीपासून आपल्या गतीमध्येदेखील कोणी फेरबदल करीत नाही. अशा या शोकमय अवस्थेचे काय कारण आहे? लष्करी मुख्यालयातून वाजणाऱ्या सायरनचा धोका आम्ही पाहू शकतो, त्याचे परिणाम लगेच होतील हे प्रत्येक जण जाणतो. दुसरीकडे निर्मात्याने ज्याच्या सावधानतेचा इशारा दिला आहे तो ऐहिक जीवनात नंतरच समजणार आहे. आम्हास त्याचे आकलन होण्यामध्ये मृत्यू अडसर आहे, आमचे डोळे ते पाहू शकत नाहीत आणि म्हणून बॉम्ब संबंधीच्या सायरनला जरी लोक तत्परतेने प्रतिसाद देत असले तरी निर्मात्याने पुरेपूर इशारा

दिला असला तरी संकटाचा काही एक परिणाम होत नाही. निर्मात्याने दिलेल्या अंतिम दिवसाच्या निश्चितपणे येणाऱ्या संकटासंबंधी जे वृत त्यांनी ऐकले त्याचा त्यांच्यावर काहीच प्रभाव नाही. यामुळे त्यांच्या पापांचे निराकरण करण्यासाठी ते उत्तेजित होत नाहीत, अथवा पुण्यशील जीवन जगण्यास सुरूवात करीत नाही.

बाहेरचे जगत पाहण्यासाठी अल्लाहने आम्हास केवळ दोन डोळेच दिले आहेत असे नाही. त्याने तिसरा डोळाही दिला आहे जो क्षितिजा पलिकडे पाहण्याची अव्यक्त वास्तव्याचेदेखील विश्लेषण करतो. हा तिसरा डोळा म्हणजे आपली बुद्धिमत्ता. लोक संशयाच्या संभ्रमात राहतात, अर्थात कारण ते बुद्धीचा वापर करत नाही. दोन डोळयांनी जे दिसते त्यावरूनच वास्तव्य जाणून घेतात. मात्र जर विचार केला तर जे दिसत आहे त्याहून अधिक खोलवर चांगले जे दिसत नाही हे स्पष्ट होते.

जे लक्षात येते त्यात एकमेव सत्य काय आहे? या प्रश्नाचे 'मृत्यु' हे सर्वमान्य उत्तर आहे. मृत्यु हे सत्य आहे ज्याच्याशी प्रत्येकास सामना करावयाचा आहे. प्रत्येकास जाणीव आहे की मृत्यु कोणत्याही वेळी आघात करू शकतो, परंतु मृत्युचा विचार ज्यावेळी लोकांच्या मनात येतो, त्यावेळी त्यांच्या डोक्यात अशाप्रकारचे घरगुती विचार येतात ''मी मेल्यानंतर माझ्या मुलाबाळांचे काय होईल? वास्तविक त्यांचे बहुतेक आयुष्य त्यांच्या मुलाबाळांच्या भवितव्याचे संरक्षण करण्यात गेलेले असते. परंतु ज्यांचे स्वतःचे पुढील आयुष्य सुरक्षित करण्यासाठी त्यांनी कोणतेही प्रयत्न केलेले नसतात. त्यांच्या दृष्टिकोनाप्रमाणे त्यांच्या मुलांच्या माध्यमातूनच ते जिवंत राहणार आहेत, ते मात्र नाहिसे होतील. त्यामुळे कोणत्याही प्रकारची तयारी करण्याची त्याना गरज नाही. मृत्युपश्चात जीवन आहे, यापासुन ते पूर्णतः अनभिज्ञ असतात. वास्तविक पाहता मृत्युनंतरच आपले जीवन सुरू होते, ज्यावेळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतात त्यावेळी त्यांचा प्रवेश दुसऱ्या जगात होत आहे याची त्यांना जाणिव झाली तरी मुलाबाळांच्या भवितव्यापेक्षा त्यांना स्वतःबद्दल अधिक काळजी वाटेल. धार्मिक असोत, की अज्ञेयवादी बहुसंख्य लोकांचा मृत्युपश्चात जीवनावर विश्वास नसतो. मृत्यूनंतर जीवन आहे याबद्दल शंका उद्‌भवण्याची दोन कारणे आहेत. पहिले हे कि मृत्यू झाल्यानंतर प्रत्येक व्यक्ती मातीत विलीन होते, त्याचे शरीर विनाश पावते, नंतर ते कोणत्या प्रकारे पूर्ववत होणार? दुसरी बाब अशी की मृत्यू नंतरचे जीवन आपणास दिसत नाही. या उलट आजचे जग आपण पाहू शकतो. प्रत्यक्ष जे पाहिले नाही त्याच्या आगमनावर आम्ही कसा विश्वास ठेऊ शकतो. आता आपण या दोन्ही बाबींचा

उहापोह करूया!

# मृत्युपश्चात जीवन

माझ्या मृत्युनंतर मला पुन्हा उठवण्यात येईल का? मृत्युनंतर जीवनाच्या सत्यतेवर ज्यांचा दृढ विश्वास नाही त्यांनादेखील हा प्रश्न भेडसावणारा आहे. परंतु जिवंतपणी खूपच कमी लोक या प्रश्नाकडे लक्ष देतात ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या अस्तित्वाबद्दल निःसंशय प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संशयाची ही खूण आहे. परंतु जर आपण मृत्युपश्चात जीवनाबद्दल गांभिर्याने विचार केला. तर त्याचे सहजपणे आकलन होते. आमची कसोटी घेण्याची निर्मात्याची इच्छा आहे. परंतु त्याने मृत्युपश्चात जीवनाचे रहस्य आम्हास सपष्टपणे सांगितलेले नाही. तथापी संपूर्ण जीवन जगभरात त्याने विचार करण्यासाठी आणि पाहण्यासाठी आम्हास संकेत दिले आहेत. त्यामुळे निर्मात्याची आणि आमच्या अवती-भोवती असलेल्या सर्वांची खरी ओळख आम्हास होऊ शकते. विश्व एक आरसा आहे. ज्यामध्ये आम्ही भावी जगाची प्रतिमा पाहू शकतो. कसे ते पाहूया.

हे सामान्य ज्ञान आहे, कि मानव सद्याच्या अवस्थेत केव्हाच नव्हता. आकारहीन अशा द्रव पदार्थापासून माणसाची निर्मिती होते, मातेच्या उदरात तो हळुहळु माणसाचे रूप धारण करतो ही प्रक्रिया जो या जगात परिपूर्ण होईपर्यंत सुरूच असते. काहीच किंमत नसलेला निरूपयोगी पदार्थ जे उघळया डोळयांना दिसत नाही त्याचे सहा फूट उंचीच्या माणसात रूपांतर होणे ही दररोजची घटना आहे. तेव्हा आपल्या शरीरातील अत्यंत सूक्ष्म अणु जमिनीवर विखुरल्या नंतर पुन्हा मनुष्याच्या आकारात एकत्रित येऊ शकणार नाहीत हे समजण्यात आम्हाला काय अडचण असावी? वस्तुतः आमच्या अवती-भवती फिरणारी प्रत्येक व्यक्ती ही असंख्य अणुंचा संचय आहे. जे अणु जगभरात विविध दिशेने आणि वातावरणात त्यापूर्वी पसरले होते, निसर्गाच्या सामर्थ्याने त्यांना एका अर्थपूर्ण आकारात एकत्रित केले, त्यामुळे आम्ही निरीक्षण करू शकतो. मनुष्याच्या रूपामध्ये त्यांना पाहू शकतो. विचार करणे, हालचाल करणे आणि संवेदनशील याच प्रक्रियेची मृत्युपश्चात पुनरावृत्ती होईल. आमच्या मुत्युनंतर आमच्या पेशींचे हवेत, पाण्यात आणि मातीत विघटन होते. त्यानंतर निर्मात्याचा आज्ञेनुसार ते पुन्हा एकत्रित जमा होतील आणि माणसाचा आकार धारण करतील. जे घडून गेले त्याची पुनरावृत्ती होणे यात विषेश असे काय आहे?

भौतिक जगामध्ये देखील जीवनाची पुनरावृत्तीच्या व्यवहार्य संकेत आहेत. प्रत्येक वर्षी पावसाळयात वनस्पती पल्लवित होते, हिरवळ सर्व दिशांना पसरते. त्यानंतर उन्हाळयाचे आगमन होते तो मृत्युची उद्घोषणा करतो आणि जमीन सुकून जाते. जिथे

फूल बहरतात तिथे ओसाड माळरान दिसते. अशा प्रकारे पूर्णावस्थेतील जीवन संपुष्टात येते, परंतु ज्यावेळी आकाशातून पुन्हा पावसाचा वर्षाव होतो त्यावेळी तीच वनस्पती पुन्हा बहरते आणि ओसाड ज़मीन पुन्हा हिरव्यागार कुरणात परिवर्तित होते. याच पद्धतीने मृत्युनंतर माणसास पुन्हा उठवण्यात येईल याकडे आपण आता दुसऱ्या दृष्टीकोनातुन पाहूया. सद्याच्या भौतिक अस्तित्वाच्या माध्यमातून निर्माण झालेली आमची वैचारिक बैठक हे याचे कारण असून त्यामुळे मृत्युपश्चात जीवनाबाबत आमच्या मनात शंका निर्माण होतात. बाह्यरूपी चालतीफिरती प्रतिकृती म्हणजेच माणूस असे आम्ही समजतो. त्यामुळे संपूर्ण शरीर कुजल्यानंतर आणि मातीत एकरूप झाल्यानंतर ते पुन्हा कसे रूपधारण करणार? आणि यास पुन्हा कसे उठवणार? याचे आम्हाला आश्चर्य वाटते. ज्यावेळी मृत्युचा प्रहार होतो त्यावेळी सजीव माणूस शांत होतो, त्याची हालचाल थंडावते आणि त्यांच्या सर्व अवयवाचे काम थांबते हे आपण पाहतो. संबधित लोकांच्या प्रथा परंपरांनुसार त्याला जमिनीत दफन केले जाते अथवा दहन केले जाते त्यानंतर काही दिवसांनी शरीर सुक्ष्म कणात रूपांतरित होते आणि ते धुळीत अशा प्रकारे एकरूप होतात की साधारण दृष्टीला ते शोधून काढता येत नाहीत. अशा प्रकारे दररोज़ आपण मनुष्याचा अंत पाहतो आणि पुर्णतः नाश झालेल्या प्रतिकृतीत पुन्हा चेतना कशी निर्माण होऊ शकेल याचे आकलन होणे आपणास कठिण वाटते.

शारीरिक आकृतीस मनुष्य असे म्हणतात. परंतु खरा संबंध त्यामध्ये असलेली चेतना याच्याशी आहे. आणि एक आकार जसे आपण जाणतो हे जिवंत पेशींनी बनले आहे. एखाद्या इमारतीत ज्याप्रमाणे विटा असतात त्याप्रमाणे या पेशींची रचना असते. या पेशी दररोज़ सतत नाश पावत असतात आणि आपण जे खाद्य घेतो त्याने याची भरपाई होत असते. अन्नाचे पचन झाल्यानंतर विविध प्रकारच्या पेशी निर्माण होतात आणि शारीरिक कमकुवतेचा असमतोल पुन्हा प्राप्त होतो. अशा प्रकारे मानवी शरीर पोखरले जाते आणि ते पुन्हा भरून येते. जुन्या पेशी नष्ट होतात आणि त्यांच्या जागी नव्या पेशी निर्माण होतात. ही प्रक्रिया दररोज़ होत असते आणि शरीराचा कायापालट होत राहतो. साधारण दहा वर्षाच्या कालावधीत ते पूर्ण बदलते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास दहा वर्षापूर्वीचे काहीच तुमच्या शरीरात राहत नसते, तुमचे शरीर पूर्णतः नवीन रूप धारण करते. जर तुमचे शरीर मागील दहा वर्षातील शरीरातील सर्व अवयव वेगळे करण्यात आले आणि पुन्हा जोडण्यात आले तर त्याप्रमाणे तुमची शरीर रचना करण्यात येऊ शकते. जर तुम्ही शंभर वर्षांचे असाल तर 'वेगवेगळे तुम्ही' जिवंत माणसांचा गोळयासारखे दिसाल. तात्पर्य तुमचा शारीरिक नाश आणि त्यांची फेररचना याचे हे नाट्य सतत चालू असते. मात्र हा फेरबदल दिसून येत नाही. प्रतिकृती ज्यास तुम्ही स्वतःची समजता ती तशीच राहते, दहावर्षापूर्वी तुम्ही दुसऱ्यांबरोबर एखादा करार केला असेल तर तुम्ही त्याप्रमाणे करार केला असल्याचे मान्य करता. मात्र त्याप्रमाणे

तुमची शरीर रचना राहत नसते. ज्या हाताने तुम्ही सही केली असेल ते हाथ अथवा साक्ष देणारी तुमची जीभ हे अवयव तशाच प्रकारे तुमच्या शरीरात नसतात. तथापि तरीही तुम्ही जिवंत असता आणि दहा वर्षापूर्वी केलेला करार हा तुमचाच असल्याचे तुम्ही मान्य करता, आणि त्याच्याशी बांधिल राहता. अशा प्रकारे अगणित शारीरिक बदल घडून आल्यानंतरदेखील अंतरयामी तुम्ही तसेच असता, त्यामुळे मृत्युपश्चात शरीराचे विघटन झाले तरी चैतन्य अबाधित राहते. शरीर बदलते, परंतु आत्मा बदलत नाही. हा शारीरिक परिवर्तनातील महत्वाचा दुवा आहे. त्याचप्रमाणे आत्म्याची शाश्वत अवस्था असते.

काही लोक जीवन आणि मृत्यु एक संचय आहे असे मानतात आणि चकबस्त या कवी ने सांगितल्याप्रमाणे ते म्हणतातः

ज़िंदगी क्या है, अनासिर में जहूरे तरतीब
मौत क्या है, इन्ही अजज़ा का परेशां होना

जिवन काय आहे? मुलद्रव्यांची पद्धतशीर रचना आणि मृत्यू त्याचे विघटन!

मात्र हे विवेचन वस्तुस्थितीतील दिसत नाही. जर मूलद्रव्यांची योग्य रचना म्हणजे जीवन असते तर त्याची रचना जो पर्यंत अबाधित राहिल तोपर्यंत ते जीवन अस्तित्वात राहिले असते, आणि अशा प्रकारे मूलद्रव्यांना एकत्रित करून तज्ज्ञ वैज्ञानिकास अशा प्रकारचे जीवन बनवणे शक्य झाले असते. त्यामुळे हे विसंगत आहे. अपघातात सर्व बाहू छिन्नविछिन्न झाल्यामुळे एखाद्याचा मृत्यू होतो हे आपण पाहतो. कोणत्याही वयात आणि कोणत्याही वर्षी लोकांच्या मृत्यु होत असतो. कधीकधी अत्यंत निरोगी आणि सशक्त माणसास हृदय विकाराचा झटका येतो आणि तो मृत्युमुखी पडतो. कोणताही डॉक्टर याचा खुलासा करू शकत नाही. मृत शरीरात सर्व मुलद्रव्ये व्यवस्थित असल्याचे आपण पाहतो परंतु शरीरातील चैतन्य काही क्षणांपूर्वी निघून गेलेले असते. सर्व अवयव निष्क्रीय झालेले असतात, त्यामुळे मूलद्रव्यांची व्यवस्थित रचना जीवन निर्माण करू शकत नाही. जीवन हे पूर्णतः वेगळी संकल्पना आहे.

जरी शारीरिक प्रतिकृती सहज तयार करता आली तरी सजीव मानव प्राणी प्रयोगशाळेत निर्माण करता येत नाही. सजीव शरीरात अगणित अणूरेणू असल्याचे सिद्ध झाले आहे. कोळशाप्रमाणेच शरीरातदेखील कार्बन असते, पाण्यामध्ये असते त्याच प्रमाणे शरीरात हैड्रोजन आणि ऑक्सिजन असते. वातावरणातील नायट्रोजन प्रमाणेच शरीरात नायट्रोजन असते. परंतु जिवंत शरीरात या वायूंची पद्धतशीर रचना करण्यात आलेली नाही, ती अभूतपूर्व नाही का? कि याहून ते काही वेगळे आहे? शास्त्रज्ञ मान्य करतात. कि काही भौतिक अणू शरीरात आहेत परंतु त्यांचे एकत्रिकरण करून आम्ही जीवन निर्माण करू शकत नाही. यावरून जिवंत माणूस म्हणजे केवळ सजीव अणूंचा संचय नाही हे सिद्ध होते.

ते 'जीवन' आणि 'अणू' यांच्या संयोग आहे. मृत्युनंतर अणूंचे एकत्रीकरण आम्ही पाहू शकतो, जीवनाचे मात्र दुसऱ्या जगाकडे प्रयाण झालेले असते. स्पष्टपणे जीवन हे वेगळे करता येत नाही. शाश्वत गुणधर्म म्हणजे जीवन हे ज्यावेळी आमच्या लक्षात येते त्यावेळी मृत्युपश्चात जीवनाचा सिद्धांत किती सयुक्तीक आणि स्वाभाविक आहे याचाही अर्थबोध होतो. मृत्युपूर्वी जे दिसते त्यात जीवन सामावले नाही हे वास्तव सांगत आहे आणि म्हणून मृत्यूनंतरही जीवन असलेच पाहिजे. या जगाचे क्षणभंगुरत्व आमचा विवेक मान्य करतो, ज्यावेळी आपण मरण पावतो त्योवेळी आम्ही विस्मृतावस्थेत जात नसतो, तर आम्ही दुसऱ्या जगात वास्तव्यासाठी जात असतो.

हे लक्षात आल्यानंतर आता बहुसंख्य लोक निर्मात्यावर आणि मृत्युपश्चात जगावर विश्वास ठेवतात ते यास नकार देतात असे नाही. तथापी त्यांच्या कृतींचे त्यांच्या विश्वासाशी साधर्म्य नसते. प्रत्यक्ष व्यवहारात लोक 'ऐहिक यश' यालाच महत्व देतात. एका उदाहरणाद्वारे आपण याचा खुलासा करूया. जर आपणास सांगण्यात आले, कि समजा जगाचे गुरूत्वाकर्षणाचे सामर्थ्य संपुष्टात आले आणि पृथ्वी हा ग्रह सूर्याकडे ताशी सहा हज़ार मैल या गतीने ओढला गेला तर काय होईल? संपूर्ण जगात हाहाःकार माजेल आणि पृथ्वीच्या पाठीवरील सर्व सजीव काही आठवडयात विनाश पावतील.

परंतु याहून अधिक भीषण आपत्तीशी हे जग संघर्ष करीत आहे हे कोणाच्या लक्षात येत नाही. हे संकट काय आहे? हे संकट आहे 'अंतिम दिवसाचे' ज्या दिवशी या जगात माणसाने केलेल्या कृत्याबद्दल त्याला जाब द्यावयाचा आहे. या विश्वच्या निर्मिती पासूनच हा दिवस या जगासाठी निर्धारित करण्यात आला आहे आणि त्याकडे अत्यंत वेगाने आम्ही चाललो आहोत. श्रद्धेचे अभिवचन म्हणून बहुसंख्य हे वास्तव मान्य करतात. काहीजण मात्र त्यास फारसे महत्व देत नाहीत, आणी मृत्युपश्चात जगाला ही फारसे महत्व देत नाहीत.

# निवाडा कसा होईल

आमचा निवाडा कसा होईल? हे समजणे आवश्यक आहे. माणसाच्या या जगातील कृत्यांचे दोन प्रकार आहेत, पहिल्या प्रकारामध्ये नैतिक मूल्यांचा समावेश नाही. या घटना प्रासंगिक असतात, आणि नैतिकतेच्या निकषांवर समाचार घेता येत नाही, कारण त्या हेतु परस्सर नसतात. दुसरा प्रकार अगदीच वेगळा आहे यामध्ये सर्व कृत्यांचा समाचार घेण्यात येईल. पुण्य आणि पाप, सदाचार आणि दुराचार अशा प्रकारची कृत्ये हेतु पुरस्सर करण्यात आलेली असतात, यालाच नैतिकता म्हणतात.

या दोन्हीमध्ये काय फरक आहे? हे आपणास एका उदाहरणाद्वारे पाहता येईल. समजा, एका झाडाच्या फांदीवर एक दगड लोंबकळत आहे जर तो पडला तर तुम्हाला इज़ा होईल, त्यासाठी तुम्ही झाडाला मारणार का? नाही! परतुं जर एखाद्या माणसाने

दगड उचलला आणि निश्चितच तुम्हाला ज़ख्मी करण्याच्या उद्देशाने तुमच्याकडे भिरकावला आणि प्रत्यक्षात त्याने तसे केले तर तुम्हाला राग येणार नाही का? आणि त्याचप्रकारे तुम्ही त्याचा बदला घेणार नाही का? ही कृती हेतु पुरस्पर असल्याने त्याला अपराधाची शिक्षा झालीच पाहिजे, ही तुमची भावना समर्थनीय आहे. एखाद्या किरकोळ घटनेसाठी हा प्रश्न नसून योग्य आणि अयोग्य कृत्यांसंदर्भात आहे. नैतिकतेच्या निकषांवर चांगल्या आणि वाईट हेतू संदर्भात आहे. या मुद्याचा खुलासा करण्यासाठी लहानशी उदाहरणे घेण्यात आली आहेत. जी सहज नज़रेत येतात आणि दुसऱ्या बाबतीत निवाडा देखील करणे ताबडतोब शक्य होते. परंतु जीवनात याहून अनेक प्रेचप्रसंगाच्या घटना घडतात ज्यामध्ये पापकृत्यांचा शोध लागत नाहीत. त्याचे परिणाम अदृश्य असतील अथवा प्रलंबित त्याच प्रमाणे नैतिकतेच्या निकषावर समाजाने केलेला धिक्कार अथवा न्यायालयात झालेला निर्णय यामुळे गुन्हेगारास शिक्षा होत नाही. काही वेळेस दुष्कृत्य दिसत असते. परंतु अपराधी हुशार आणि युक्तिबाज असल्याने तो शिक्षा टाळण्यास समर्थ असतो. अथवा मानवी अधिकार त्याला शिक्षा देण्यास तोकडे पडतात. त्यामुळे अपराधी मुक्त संचार करीत असतो. अशाच अपराध्यांना अंतिम दिवशी निर्मात्यापुढे विचारणा करण्यासाठी बोलावण्यात येईल. कोणीही असो, त्यात त्याच्या निर्मात्यापुढे उभे रहावे लागणार आहे. आपल्या जीवनाचा अहवाल त्याच्या पुढे उघड करावा लागेल. त्याने केलेल्या पुण्यशील कृत्यांमुळे त्याला स्वर्ग प्राप्त होईल आणि पापजन्य कृत्यांमुळे त्याची नरकाग्नीत रवानगी होईल. हे सर्व गुप्त ठेवण्यात आले आहे याचे कारण निर्मात्याच्या योजनेप्रमाणे माणसाची कसोटी घ्यावयाची आहे. माणसास हे कळले तर त्याच्या कसोटीस काहीच अर्थ राहणार नाही.

माणसाच्या प्रत्येक कृतीचे काही परिणाम संभवतात. पत्येक अवस्था त्याच्यासाठी ‘अनुकूल’ किंवा ‘प्रतिकूल’ असते. अशा अवस्थेत तो लाभ घेतो अथवा खचून जातो. जर त्याने योग्य प्रतिसाद दिला तर तो कसोटीत उत्तीर्ण होतो.

# मृत्युपश्चात जग म्हणजे काय?

या नंतरचे, अर्थात मृत्युपश्चात जग म्हणजे असे ठिकाण जिथे माणसास त्याच्या कृत्यांनुसार आणि नैतिकतेनुसार पूर्ण मोबदला मिळेल. ज्यावेळी यानंतरच्या जगासंबंधी आम्ही विचार करतो त्यावेळी काही प्रश्न उभे राहतात. या जगाच्या अस्तित्वाची माणूस कशी कल्पना करू शकतो आणि त्यासाठी तयारी म्हणून त्याने काय केले पाहिजे?

यासाठी आपण आवाजाचे उदाहरण घेऊया. आवाज़ म्हणजे अशा ध्वनीलहरी ज्या उघडया डोळयांनी दिसत नाहीत. माणसाचा आवाज़ जिभेची आणि घशाची हालचाल यातून निर्माणा होतो. हा आवाज़ आणि ध्वनी लहरी वातावरणात अदृष्यरित्या

स्थिरावतात. वैज्ञानिक सिद्धांतानुसार हज़ारों वर्षांपूर्वी माणसाने कोणत्याही प्रकारच्या आवाज़ केला असेल किंवा तो काही बोलला असेल तर त्याच्या ध्वनीलहरी अस्तित्वात राहतात. जर आपल्याकडे असे उपकरण असेल की जे या ध्वनीलहरी मुद्रित करू शकते तर तो आवाज़ निश्चित मूळ स्वरूपात आपण पुनः प्रसारित करू शकतो आणि अनेक ऐतिहासिक बाबी आपण ऐकू शकतो. आपल्यावर हवेचे आवरण आहे. ज्यावर आमचे शब्द आमचा आवाज़ कोरला जातो. आम्हाला हवेचे आवरण दिसत नाही त्याचप्रमाणे जे काही कोरले जाते तेही दिसत नाही. याच पद्धतीने दुसऱ्या जगानेदेखील आम्हाला चारी बाजूने घेरले आहे आणि सातत्याने आमच्या हेतूंचे, आमच्या योजनांचे ध्वनी मुद्रण चालू आहे. आमची सर्व कृत्ये कोरली जातात. आमच्या मृत्युनंतर सर्वांना वाचनासाठी खुले होईल. फोनो वरील प्लेट! ती फिरते, त्यावेळी आवाज़ येत नाही. परंतु बारिक पिन त्याच्यावर ठेवण्यात आली, की लगेच त्यातून आवाज़ येऊ लागतो. अशाच प्रकारे आमच्या कृत्यांचे मुद्रण तयार होत असते आणि ज्यावेळी जगाच्या निर्मात्याची आज्ञा होईल त्यावेळी आमचे ध्वनीवृत आम्हाला पुन्हा ऐकवले जाईल. जे ऐकल्यानंतर लोक उत्स्फूर्तपणे म्हणतील. ''कसे हे पुस्तक ज्यातून लहानातून लहान गोष्ट अथवा सर्वाधिक मोठे प्रकरणदेखील वगळण्यात आलेले नाही.'' (कुरआन १८:४६).

# उत्तरदायित्वाची संकल्पना

माणसासाठी अल्लाह अर्थात निर्माता अपरिहार्य आहे. निर्मात्याखेरीज त्याचे जीवन अपूर्ण आहे. एका तत्ववेत्याने जे सांगितले आहे ते योग्य आहे की जर निर्माता नसता तर आम्हास एखादा निर्माता शोधून काढावा लागला असता. सुदैवाने प्रत्यक्षात अल्लाह आहे. आपण अल्लाहवर पूर्णपणे विश्वास ठेऊ शकतो. कल्पना अथवा भावना म्हणून नव्हे, तर एक सत्य म्हणून! आणि आमच्या जीवनात त्याला आपण योग्य उच्चस्थान प्रदान करू शकतो. आपल्या जीवनाचे नियोजन करण्यासाठी माणसाजवळ स्वतःचा एक सिद्धांत असला पाहिजे- निर्मात्याने न्याय्य असा सिद्धांत दिला आहे- जीवनाच्या व्यवस्थापनाची पूर्ण तत्वप्रणाली!

मानव म्हणजे यांत्रिकी पद्धतीने नियंत्रण केले जाणारे यंत्र नाही. केवळ संवेदनाहीन अथवा इतर नियंत्रित प्राण्याप्रमाणेदेखील तो नाही. माणूस स्वातंत्र्य उपभोगतो आपल्या मर्ज़ीनुसार त्यांच्या कृत्या बाबतीत निर्णय घेतात. प्रश्न असा आहे कि माणसास योग्य मार्गावर कसे ठेवायचे? त्याच्या वर्तणुकीमध्ये त्यास सातत्याने शिस्तबद्ध कसे करावयाचे? सामाजिक दबाव असोत, जमिनीसंबंधी कायदे असोत, धर्म सुधारकांचे अवाहन असोत या बाबतीत सर्व ऐहिक उपाययोजना अपयशी ठरल्या आहेत असा इतिहास आहे.

संपूर्णतः परिणामातून नसले तरी सामाजिक बंधने मर्यादीत आहेत असा

अनुभव आहे. कायद्यामध्ये अनेक त्रुटी आहेत त्यामुळे अपराध्यास सुटकेचा मार्ग सापडणे कठीण नाही. सुधारकांच्या आवाहनांचा प्रयत्न क्रांती घडवून आणू शकत नाही.

सत्य असे आहे. शिस्तबद्ध वर्तणुकीसाठी आपल्याहून अधिक श्रेष्ठ अशी शक्ती अस्तित्वात आहे यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. अशी शक्ती ज्याला माणसाच्या कृत्यांची क्षणोक्षणी जाणीव असते, जी माणसास बक्षिस अथवा शिक्षा देऊ शकते आणि जिच्यापासून सुटका करूण घेणे अशक्य आहे.

अशा प्रकारची एकच शक्ती अस्तित्वात आहे त्याला आपण अल्लाह (निर्माता) म्हणतो. एकाच वेळा दोन प्रकारे निर्मात्यावरील श्रद्धा प्रकट होते. एक असे की, निर्माता म्हणजे आपला संरक्षण असून ज्याला आपल्या सर्व कृत्यांची माहिती असते. त्याचबरोबर शिक्षा करण्यासाठी त्याच्याकडे अमर्याद सामर्थ्य आहे. सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये खाजगी अथवा सार्वजनिक, निर्माता माणसास निर्धाराने योग्य मार्गाचा अवलंब करण्यास भाग पाडतो. अशा प्रकारे तो निर्मात्याच्या रागातून स्वतःचा बचाव करू शकतो.

दुसरा मुद्दा असा की, निर्मात्यावर विश्वास म्हणजे अमर्याद आशाआकांक्षांचे संग्रहालय आहे. तर सत्याचे पालन करताना नुकसान झाले, किंवा दुसऱ्या आपत्ती मुळे नुकसान झाले तर प्रभावीपणे ते सहन करण्याचे त्याच्यामध्ये सामर्थ्य आहे ही श्रद्धा उराशी बाळगून माणूस या जगात आपले जीवन व्यतीत करू शकतो. जर सत्याचा मार्ग त्याने सोडला नाही तर शाश्वत स्वर्गाच्या स्वरूपात निर्माता त्याला बक्षीस देईल आणि याहून मोठे कोणतेच बक्षिस नाही. स्वतःस नैतिक मूल्यांशी बांधून घेणे अथवा न्यायसंगत राहणे हे माणसासाठी शक्य नाही. जर त्याचा सर्वश्रेष्ठ सामर्थ्यावर अर्थात निर्मात्यावर दृढ विश्वास असेल तरच हे शक्य आहे. ही सर्वश्रेष्ठ शक्ती अथवा सामर्थ्य परिपूर्ण न्यायसंगत आहे. माणसाला सत्याच्या मार्गाकडे घेऊन जाते हे त्यालाच शक्य आहे. त्याचप्रमाणे जो सत्याच्या मार्गापासून विमुख होतो त्याला शिक्षा करण्याचेही त्याच्यामध्ये सामर्थ्य आहे. एखाद्या गुन्हेगारास शिक्षा करण्यासाठी हे मर्यादित जग खूप लहान आहे. त्याचप्रमाणे पुण्यवंतास मोठे बक्षीस देण्यासाठीही हे जग लहान आहे. निर्मात्याची संकल्पना म्हणजे, निर्माता सद्याच्या जगापेक्षा सर्व मर्यादांपासून मुक्त असे अधिक चांगले जग तो निर्माण करू शकतो. जिथे बक्षिस आणि शिक्षा दोन्हीची समाधानकारकरित्या अमलबजावणी होऊ शकते.

शाश्वत आणि समर्थ निर्माता आणि त्याचे उत्तरदायित्वची संलग्न आहे. उत्तर दायित्वाची संकल्पना योग्य विचार आणि योग्य कृती याची हमी देते. निर्मात्याच्या शिक्षेच्या आठवणीमुळे माणूस सावध होतो. याखेरीज कोणत्याही परिस्थितीत आणि मोबदल्यात जो सत्याचा मार्ग सोडत नाही. निर्मात्याच्या बक्षिसांवर त्याचा विश्वास दृढावतो.

निर्मात्यावरील श्रद्धेमुळे माणसास अशी तत्वप्रणाली लाभते. कि ज्याच्या माध्यमातून नुकसान फायद्यात परिवर्तित होते आणि यातना शुभसंदेश देऊन जातात.

# माणसा, वास्तव ओळख !

काही क्षण यावर विचार करा. दीर्घ आणि एकसलग असे आयुर्मान तुमचे प्रारंभ आहे. मृत्यू या जीवनास खंडित करते. नवीन कालखंडाचा तो प्रारंभ असतो. उदाहरण म्हणून शेतकऱ्याचे पीक लावणे पहा. तो त्याचे भांडवल यात गुंतवतो, पिकाची मशागत होते आणि सुकते. त्यानंतर सुगीच्या हंगामात तो स्वतःसाठी वर्षभरासाठी अन्नधान्याचा साठा करतो. पिकाचा वाढीत सुगीचा हंगाम ही एका टप्प्याची अखेर आहे. या टप्प्यात पीक लावणे आणि त्याची मशागत करणे यांचा समावेश आहे. पिकाची कटाई होईपर्यंत श्रम आणि खर्च एवढेच करावे लागते, त्यानंतर त्याच्या परिश्रमाचे फळ त्याला मिळेल.

आपल्या जीवनाबद्दलदेखील असेच सांगता येईल. या जगात आपण गुंतवणूक करतो आणि त्यानंतर दुसऱ्या जगात मिळणाऱ्या मोबदल्यासाठी तो मशागत करतो. आपल्यापैकी प्रत्येकाजवळ शेती आहे. कोणी त्याची मशागत करतो, तर कोणी त्याचे माळरान करतो. पेरणी केल्यानंतर आपण त्याकडे लक्ष देतो अथवा दुर्लक्ष करतो. आम्ही काटे उगवतो किंवा फुलं आणि फळ आमच्या बागेत बहरतात. आम्ही आमच्या पिकांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून आपले परिश्रम खर्च करतो. अन्यथा आमचा वेळ व्यर्थ घलवतो. पिकांच्या मशागतीचा हा कालखंड मृत्युपर्यंत चालतो. आमचा मृत्युचा दिवस हा सुगीचा दिवस आहे. त्या दिवशी आमचे डोळे या जगात बंद होतील जे मृत्युपश्चात जीवनात उघडतील. त्यावेळी आयुष्यभर आम्ही जे पीक जोपासतो, ते आमच्या समोर असेल.

लक्षात ठेवा. जी व्यक्ती शेती करते तिलाच पीक मिळते. त्याने पेरलेल्या धान्याचीच तो कापणी करतो. याच पद्धतीने नंतरच्या जगात मृत्युपूर्वी जशी मशागत केली तसे पीक त्याला मिळेल. प्रत्येक शेतकऱ्यास हे चांगले माहित असते, की त्याने जेवढी मशागत केली तेवढया अन्नधान्याचा साठा त्याला मिळतो, आणि त्याने जे पेरले तेच त्याचे धान्य असते. दुसऱ्या जगात या जगात केलेल्या परिश्रमानुसार मोबदला मिळेल. प्रयत्न आणि परिश्रम यासाठी निर्धारित वेळ ज्यावेळी खंडित होतो त्यावेळी मृत्युची अखेरची उद्घोषणा होते. दुसरे जग हे अंतिम ठिकाण आहे ज्या ठिकाणी याचा त्याला अनुभव येईल. मृत्युनंतर प्रयत्न करण्याची कोणतीच संधी उपलब्ध नाही. आणि हेदेखील लक्षात असावे की मृत्युपश्चात जीवन कधीही खंडित होणार नाही.

हा प्रकार किती भयंकर आहे! आणि म्हणून माणसाने त्याच्या मृत्युपूर्वी आपली वैचारिक बैठक परिपक्व करावी. मृत्युनंतर सत्याची जाणीव झाल्यास खूप उशीर होईल. कारण नंतर झालेल्या जाणीवेपासून त्याला काहीच फायदा नाही. यात एखाद्याच्या चुकीचे

गांभिर्य विचारात घेण्यासाठी वेळ नसतो. पश्चातापासाठी वेळ नसतो. तसेच परिश्रमासाठी देखील वेळ नसतो.

मानवास प्रारब्धाचा विसर पडतो. वेळ मात्र त्याच्या पिकांची कापणी करण्यासाठी झपाट्याने त्याच्या पुढे निघून जाते. जगामध्ये जो काही सुलभ फायदा आहे तो मिळवण्यात दंग होतो आणि योग्य प्रकारे आपण कामात आहोत असे त्याला वाटत असते. वस्तुतः तो आपला मौल्यवान वेळ वाया घालवित असतो. स्वतःचे भवितव्य समृद्ध करण्यासाठी अमूल्य संधी त्याच्या समोर असते. परंतु तो क्षुल्लक आणि कमी महत्वाच्या गोष्टीत गुंतलेला असतो. त्याचा निर्माता त्याला शाश्वत प्रतिष्ठा आणि कृपा असलेल्या स्वर्गात येण्याच आवाहन करीत असतो. मात्र तो त्याच्या अज्ञानामुळे फसव्या आनंदात मग्न असतो. त्याला वाटते आपण बचत करीत आहोत. परंतु तो उधळपट्टी करीत असतो. जगातील निवासस्थान बांधताना तो अशा भ्रमात असतो, की तो आपल्या जीवनासाठी ते बांधत आहे. परंतु तो वाळूच्या भिंती बांधतो ज्या कोसळणाऱ्या आहेत. माणसा, विचार कर. तू काय करतो आहेस आणि काय करणे तुझे कर्तव्य आहे?

# भौतिक जीवन

पृथ्वी उपग्रह आहे. ती सातत्याने सूर्याभोवती फिरत असते. ही परिक्रमा पूर्ण होण्यासाठी एक वर्ष लागते. पृथ्वीवरील मानवी जीवनासाठी हे तिचे भ्रमण आवश्यक आहे. जर पृथ्वी सूर्याभोवती फिरली नसली तर त्याच्या आयुष्यास काहीच अर्थ राहिला नसता आणि आयुष्य संपुष्टात आले असते.

या जगामध्ये आम्ही आपले आयुष्य कसे व्यतीत करावे याचे हे व्यावहारिक उदाहरण आहे. अशाच प्रकारे माणसाने निर्मात्याभोवती परिक्रमा करणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा, की माणसाची कृत्यें निर्मात्यावर अवलंबून असणे आवश्यक आहे.

निसर्ग नियमानुसार पृथ्वीचे सूर्याभोवती फिरणे अनिवार्य आहे. मात्र माणसाचे तसे नाही. तो आपल्या इच्छेनुसार अल्लाहस समर्पित झाला पाहिजे. निर्मात्याच्या संकल्पनेवर त्याने आपले जीवन उभारले पाहिजे. माणसाचे आरोहण त्याच्या चेतनेवर अवलंबून आहे. या चैतन्यातच त्याचे यश सामावले आहे. निर्मात्याच्या शोधातच निर्मात्याने बहाल केलेले जीवन आहे. व्यक्ती, पुरूष अथवा स्त्री असो, ज्यावेळी त्यांना निर्मात्याचा शोध लागतो त्याच वेळी त्याला सत्याचा शोध लागतो आणि हेच सत्य त्यांचे संपूर्ण जीवन व्यापून टाकते. सत्य सापडले हा विचार एक भाराऊन टाकणारी अनुभूती आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये अल्लाहबद्दल शाश्वत श्रद्धा निर्माण होते. हा शाश्वत विधाता त्याच्या जीवनातील सर्व नैराश्य दूर करतो आणि म्हणून नुकसान याला काही अर्थ नसतो. जो पर्यंत ते निर्मात्याच्या सानिध्यात आहेत.

अल्लाहच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे माणसास या जाणीवेची अनुभूती

होते. सद्याचे विश्व हे अल्लाहच्या गुणधर्माचे वर्णन आहे. त्याची पूर्ण ओळख आहे. विश्वाच्या निर्मितीत अल्लाहचे दर्शन घडते. आरशामध्ये माणूस आपले स्वतःचे प्रतिबिंब स्पष्टपणे पाहातो त्याप्रमाणेच निर्मात्याचे हे दर्शन आहे.

विस्तीर्ण अंतराळाचा निर्माता अल्लाह अमर्याद, अनंत आहे. सूर्य आणि तारे यांचे तेज यांच्या निरीक्षणातून अल्लाह प्रकाश आहे हे लक्षात येते. पर्वताची शिखरे अल्लाहचे महानत्व सांगतात. समुद्रातील वारा आणि नद्यांचा प्रवाह अल्लाह अमर्याद कृपांचे संग्रहालय आहे हे निदर्शनास आणून देतात. हिरवा वृक्षामध्ये आम्हाला अल्लाहचे औदार्य दिसून येते. माणसाच्या अस्तित्वाचा हा पुरावा आहे. हवेच्या सुगंधात माणसास दैवी स्पर्शाचा अनुभव येतो. पक्षाच्या चिवचिवाटात त्याला निर्मात्याचे गाणे ऐकू येते. अल्लाहच्या स्मरणातच त्याने बहाल केलेले जीवन सुरू होते. माणसास अल्लाहच्या अस्तित्वाची जाणीव होण्यास सुरूवात होते. प्रत्येक गोष्ट त्याला अल्लाहची आठवण करून देत असते. त्याच्या अंतः करणातून अल्लाहचे स्मरण कधीच जात नाही. त्याची सकाळ आणि त्याची संध्याकाळ अल्लाहच्या सानिध्यातच जाते. पावसामुळे पीक पल्लवते, तसेच तो अल्लाहच्या स्मरणात मग्न होतो.

अल्लाह माणसाचा आध्यात्मिक केंद्रबिंदू आहे. त्याच्याशी ज्याची बांधिलकी आहे तो प्रत्येक क्षणी आध्यात्मिक अनुभवातून जात असतो. अल्लाहवरील श्रद्धा आणि अध्यात्मिक विकासाचे स्त्रोत आहे. जे निर्मात्याच्या प्रेमात भटकलेले आहेत त्या व्यक्तीरिक्त दुसरे काही त्याला नको असते. निर्माता त्याच्यासाठी एक अथांग समुद्रासारखा असतो. त्यामध्ये तो पोहत असतो. अध्यात्मिक जागृतीच्या माध्यमात त्याला अशी संपत्ती मिळते, की त्याला कशाचीच गरज भासत नाही.

ज्याला निर्मात्याचा शोध लागला त्याच्यासाठी संपूर्ण विश्व म्हणजे अल्लाहसंबंधी एक खुले पुस्तक आहे. वृक्षाचे प्रत्येक पान या दिव्य पुस्तकाचे पान होते.

ज्यावेळी तो सूर्य पाहातो त्यावेळी मनुष्यास वाटते, कि निर्माता आकाशातील दिवा प्रज्वलित करीत आहे. विश्व एखाद्या दिव्य विद्यापीठासारखे आहे आणि तो तिचा विद्यार्थी आहे असे वाटते.

निर्माता त्याच्या प्रेमाच्या शोधात आहे हे त्याच्या लक्षात येते. मानव जन्मापासून सर्वश्रेष्ठ निर्मात्याच्या (अल्लाहच्या) शोधात आहे. तो अनंत अमर्याद आहे, त्याचा शोध लागल्यानंतर वयस्कर गृहस्थास समाधान वाटते आणि जणूकाही तो आपल्या आईच्या हातातच आहे असा त्याला भास होतो. निर्मात्याच्या शोधामुळे दुसऱ्यास त्याचा भागीदार करण्यापासून त्याचा बचाव होतो. निर्मात्याचा शोध घेण्यात अपयश म्हणजे सर्वाधिक मोठी गरज भागवण्यात माणसास आलेले अपयश.


अल्लाहची जागा दुसऱ्यास देणे या उत्कंठेतून माणसास त्याचा शोध घेण्यात अपयश येते. ही दुसरी जागा विशिष्ट माणसाला, कधीकधी विशिष्ट प्राण्याला, कधी


निसर्गाला, कधी एखाद्या भौतिक शक्तीला, कधी गृहित कल्पनांना, तर कधी स्वतःलाच देण्यात येते.


जरी निर्मात्याचा शोध घेण्यात अपयश आले किंवा तो नाकारणारा झाला तरी शोध घेण्याची त्याची उर्मी दाबून टाकणे स्वभावतः त्याच्या अथवा तिच्या सामर्थ्या बाहेरचे आहे. आणि म्हणून ज्याना अल्लाहचा शोध लागत नाही ते दुसरेच काहीतरी निर्माता म्हणून गृहित धरतात. अल्लाहस प्रार्थनेस पात्र समजल्यास माणसाची प्रतिष्ठा उंचावते. या उलट अल्लाहखेरीज इतर कोणासही निर्माता समजणे ते मानवतेच्या स्तरावरून खाली कोसळण्यासारखे आहे. मानवासाठी आणि संपूर्ण विश्वासाठी अल्लाहस समर्पित होणे हा एकच मार्ग आहे.


## Towards Spiritual Living


Al-Risala and Spirit of islam are two monthly spiritual magazines. They aim at helping indivuduals discover for themselves answers to their questions on spirituality, religion, this life and life beyond, and also instill in them the spirit of dawah work.















## Annual Subscription

Al-Risala : India - ₹200 Overseas - US $ 20

Spirit of Islam : India - ₹400 Overseas - US $30

**Al-Risala**
1, Nizamuddin West Market, New Delhi - 110013
Tel.: 011-41827083 / 46521511 / Mob.: +91-8588822679 / +91-8588822680

**Spirit of Islam**
002, HM Wimberly, 6, Barlie Street Cross, Langford Town, Bangalore - 560025
**Mob.:** +91-8050202626 / **Email :** subscription @thespiritofislam.org
**Web :** www.spiritofislam.co.in

---


ही पुस्तिका खालील पत्त्यावर मिळेल.

अब्दुस समद खलिल अहेमद
१०५०, रविवार पेठ, पुणे – ४११००२
फोन नं. : 020 24472830 मोबा. नं.: 9665059035

# THE QURAN

A book which brings glad tidings to mankind along with divine admonition, stresses the importance of man's discovery of truth on both spiritual and intellectual planes. The main themes of the Quran are enlightenment, closeness to God, peace and spirituality. The objective of the Quran is to make man aware of the Creation Plan of God.

## Available in different languages
## Easy to understand




Buy Online / Order Free Quran / Download / Be a Quran Distributor

www.goodwordbooks.com / www.j.mp/freequran4all